## प्रकरण चौथे

## वृध्द श्रोतकऱ्यांची मानसिक आवस्था

### मानवी मनाचे मानवी जीवनातील स्थान :-

मानव हा जिव सृष्टीचा असा एकमेव सभासद आहे की, निसर्गाने त्याला देणग्या दिलेल्या आहेत. त्या देणग्यांचा स्वत:च्या विकासा खाली त्याने पध्दतशीर पणे वापर करून घेतल्या मुळे तो आज मानव पदाला पोहचला आहे. आवाजाची देणगी बहुतेक सर्व प्राण्यांना लाभलेली असती पण ते आवाजाला आकार देवून शब्दात स्मांतर करून त्या शब्दांना भाषा करण्याची कला मानवानेच शोधून काढली आहे. या शब्दांना अक्षर बध्द करण्याचे कौशल्य त्यानेच शोधून काढले आहे. कमी जास्त प्रमाणात मेंदूची किंवा बुध्दीची देणगी सर्वच प्राण्यांना असले त्याचे देहाचे सर्व व्यवहार मेंदूतुन नियंत्रित केले जातात. याचाच अर्थ त्यांना बुध्दीची देणगी असते पण त्या बुध्दीचा वापर केवळ आपल्या शरीराचा गरजा भागवण्या पलीकडे इतर प्राण्यांनी केला नांही. म्हणून ते प्राणीच राहीलेले आहेत. मानवाची देणगी देखील इतर प्राण्यांना लाभालेली असते पिलांना जन्म देतात त्यांचा सांभाळ करतात याचा अर्थ वात्सल्य भावना त्यांचातही दिसून येते पण या मनाचा ही विकास इतरांनाही साधता आला नांही. मानवाने मात्र या बाबतीत ही विकासाची प्रचंड मजल मारली आहे. मानवी मनाचा इतका विकास घडून आला आहे की मानवी जिवनाला सर्व व्यवहाराचे केंद्रस्थान मानवी मनाला प्राप्त व्हावे.

कोणताही विचार प्रथम मानवी मनात निर्माण होतो मग त्याचे आचारात रूपांतर होते. मनात निर्माण झालेल्या प्रेरणेचे विचारात रूपांत करण्याचे काम मेंदूचे, आणि विचाराचे आचारात रूपांतर करण्याचे काम हात पाय व तोंड वगैरे इतर अवयवांचे असते. याचाच अर्थ मानवी मन हे सर्व मानवी हालचालींचे किंवा घटना दुर्घटनांचे निर्मीती स्थान किंवा प्रेरणा स्थान असते मनात चांगल्या प्रेरणा निर्माण झाल्या तर चांगले विचार व्यक्तीच्या डोक्यात येतात त्यांच्या अवयवाकडून चांगले आचार घडून येतात. वाईट किंवा अनिष्ट प्रेरणा मनाने निर्माण केल्या तर अनिष्ट किंवा वाईट वर्तन घडून येते.

मनाची ठेवण कशी असते यावरून मानसाचे वर्तन कसे ते ठरते म्हणूनच मानसिक परिस्थितीला मानवी वर्तना मध्ये आणि मानवी जीवना मध्ये अनन्य साधारण महत्व प्राप्त होते वृध्द शेतकरी किंवा शेतकरी वृध्द देखील याला अपवाद नांही शेतकऱ्यांच्या वृध्दाप काळातील मानसिक परिस्थितीचाही त्यांच्या वर्तनावर व एकंदर जीवनावर होत असतो. याची प्रचिती वृध्द शेतकऱ्यांचा अभ्यास करीत असतांना आढळून आली

मानसिक परिस्थितीची आवस्था सभोतालच्या परिस्थितीवरून शारीरीक आवस्थे वरून ठरत असते. व्यक्तीला आनंद होतो याचा अर्थ त्याच्या मना मध्ये आनंदाचे तरंग निर्माण होणाऱ्या घटना घडलेल्या

असतात. म्हणजेच त्याला आवडणा-या गोष्टी त्याच्या संबंधी किंवा समोताली घडलेल्या असतात मनुष्याला दु:ख होते कारण त्यांना न आवडणा-या किंवा त्यांच्या मनात दु:खाचे तरंग निर्माण करणा-या अनिष्ट घटना घडलेल्या असतात किंवा घडत असतात मानसिक परिस्थितीचा मानसाच्या वर्तनावर कसा परिणाम होतो. या दृष्टीने अभ्यास क्षेत्रातील शेतकरी वृध्दांच्या अभ्यास करण्याचा प्रयत्न केला किंवा वृध्द शेतक-यांचा मनाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला असतांना जे आढळले त्याचे स्वरुप पुढील प्रमाणे

[१] वृध्द शेतकरी मानसिक दृष्ट्या समाधानी नसतात :

अभ्यासासाठी निवडलेल्या वृध्द शेतक-यांना " तुम्ही मानसिक दृष्ट्या समाधानी आहात का? " हा प्रश्न विचारला या प्रश्नाचे उत्तर फारच थोड्या वृध्दांनी होय असे दिले. सर्व साधारणत: मोठे किंवा बागायतदार शेतकरी याचे होय म्हणता-या मध्ये जास्त प्रमाण आढळले याचा अर्थ मानसिक समाधानाचा त्यांच्या आर्थिक परिस्थितीशी थोडका असे ना संबंध असावा ज्याची मुले किंवा सुना सुस्वभावी आहेत किंवा ज्यांनी जमीनी सह सर्व संपत्ती स्वत:च्या नांवावर राखन्या मध्ये यश मिळविले आहे. असे शेतकरी मानसिक दृष्ट्या समाधानी असल्याचे आढळले याच्या उलट अल्प भूधारक किंवा भूमी हीन शेतमजूर वृध्द आणि बागायतदारांच्या पैकी देखील कांही जन

या प्रश्नाला नकारार्थी उत्तर देणारे निघाले बहुसंख्य शेतकरी वृध्दांनी आपण समाधानी नांही मुले ऐकत नांही सुनाशी पटत नांही नाईलाज आहे काय करायचे? कोठे जायचे? मरण येई पर्यंत जगायचे अशी उत्तरे दिली याचाच अर्थ मानसिक दृष्टया शेतकरी वृध्द समाधानी नसतात.

[२] कुटूंबाशी पटत नांही :-

" घरात भांडणे होतात का? मुले नातवंडे तुमचे एकतात का? " असे कांही प्रश्न वृध्दांना विचारले त्या प्रश्नांना देखील बहुसंख्य शेतक-यांनी निराशाजनक उत्तरे दिली x मुलांचे किंवा नातवंडांचे पटत नांही आपल्या इच्छे विरूध्द सर्व चालले असते त्यामुळे घरात भांडणे तंटे निर्माण होतात असे कबूल केले असे का होत असावे ? याचे उत्तर मात्र देता आले नांही. मात्र संशोधकाच्या मात्र लक्षात आले की दोन पिढया मधील हा मानसिक संघर्ष आहे परंपरागत जीवन पध्दती किंवा विचार सरणीला वृध्द चिकटून असतात तर नव्या विचाराच्या मागे तरूण किंवा मुले लागलेली असतात त्यांच्या पिढीतील अंतर [ ] हे त्यांच्या विचारातही अंतर निर्माण करते त्यामुळे प्रत्येक बाबतीत मतभेद निर्माण होतात शेतीत कोणती पिके घ्यावीत कोणती खते वापरावीत घरात कोणत्या वस्तू असाव्यात कपडे कशी असावीत जनावरांची निगा कशी राहावी वगैरे विषय

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

टिप - प्रकरणाच्या शेवटी दिलेले x कोष्टक व आलेख पहावा

हे वृध्द आणि तरुण यांच्या मतभेद निर्माण करणारे असतात या संदर्भात अभ्यास क्षेत्रातील एक घरंदाज शेतकरी आणि त्यांच्या सुशिक्षीत मुलगा यांच्या बाबतीत घडलेली हकीगत महत्वाची आहे.

मुलगा प्राध्यापक असून तालुक्याच्या गांवी राहतो. वडील शेतावर राहून शेती करुन क्षेतात वडीलांचे वय ९० त्यामुळे त्या प्राध्यापकाने पिक पध्दती बद्दल बदल करण्याचा निर्णय घेतला वडीलांच्या नंतर कायमपणे शेतीवर राहून शेती करता येणार नांही हे जाणून मुलांने परंपरागत पिका ऐवजी वृक्ष शेती करण्याचा निर्णय घेवून निलगीरीची लागवड सुरु केली वडीलांनी त्याला तीव्र विरोध केला इतका विरोध केला की दोघांचे प्रकरण हातघाईवर आले बाप आपण मिळीवलेल्या जमीनीत जंगल करायला तयार होईना मुलगा आपला हट्ट सोडायला तयार होईना शेवटी नोकर मंडळी मध्ये येवून प्रसंग निभावून नेला प्राध्यापक मुलांने समंजस्याने निलगीरी लागन पुढे १५ दिवस ढकलली व त्या दरम्यांन निलगीरी शेतीची कांही पुस्तके वडीलांना वाचून दाखविण्याचे काम त्यांच्या नातवावर सोपविले गावातील कांही सुशिक्षित मानसांनी मध्यस्थी करुन वडीलांचे मन वळीवले कटू प्रसंग टळून निलगीरीची लागवड केली आज तोच वृध्द शेतकरी निलगीरीचे फायदे आपल्या शेजाऱ्यांना सांगत आहे. मुलगा

सुजान आणि संमंजस असल्याने कटू प्रसंग टळला पण इतरत्र हे घडत नांही मुलगा आणि वडील दोघेही आडाणी आणि अर्ध सुशिक्षित असतील तर संघर्ष वाढत जातात भांडण व तंटे निर्माण होतात शेताच्या बांधाच्या घरात गल्लीत परस्परांना शिवीगाळ करतांना किंवा सासवा सुना गल्लीत येकमेकीवर तुटून पडतांना दिसतात याचा अर्थ शेवटी माता-यांना माघार घ्यावी लागते अपमान गिळून मुकाटयाने जगावे लागते. त्याचे चुकते की बरोबर हा प्रश्न नांही पण ते परावलंबी असल्या मुळे मानहानी पत्करुन पडते घेवून जीवन जगावे लागते. हा या ठिकाणी महत्वाचा प्रश्न आहे.

[३] वृध्द शेतकरी मानसिक दृष्टया असुरक्षित वाटतो :-

अभ्यास क्षेत्रातील ५९ टक्के शेतक-यांना वृध्दाप काळा मध्ये आपण एकाकी निराधार किंवा सुरक्षित असल्या सारखे वाटत असते x इतकेच नव्हे तर कांही तरूण शेतक-यांच्या मनात देखील आपण म्हातार पणी कसे होणार ही चिंता निर्माण झालेली असते. म्हातार पणी आपल्याला आपली मुले पहातील का ही शंका बहुसंख्य शेतक-यांना भेडसावत असते. ही चिंता किंवा काळजी मना मध्ये ठेवूनच शेतकरी वावरत असतात मुलगा झाल्या बरोबरच शेतक-याला आनंद होतो आयुष्याचे सार्थक झाल्या सारखे वाटते. पण त्या आनंदाला हा मुलगा

---

संदर्भ :- प्रकरणाच्या शेवटी दिलेले कोष्टक

मोठा झाल्यावर व आपण म्हातारे आपली काळजी घेईल का ही चिंता ही त्या वेळे पासून मनात निर्माण झालेले असते जुन्या पिढीतील अशिक्षित वडील आणि नव्या पिढीतील शिक्षीत किंवा अर्ध शिक्षीत मुलगा अशी सध्या ब ग्रामीण शेतकरी समाजाची सरळ विभागणी झालेली आढळून येते. भाषा वेष भूषा विचार सरणी या सर्वच बाबतीत भिन्न आवस्था एकत्रीत नांदतांना दिसतात म्हाता-यांची तीनकोनी लंगोटी आणि मुलग्याची बेलबॉटम पॅन्ट एकाच घरात खुंटीला अडकवल्याचे दृश्य ग्रामीण शेतकरी समाजात दिसून येते.

सिकलेली मुले अशिक्षित बापाला मान तर देतच नांहीत. उलट अपमान करतात बापाची पायताने पोराला यायला लागल्या बरोबर ती पायतानेच उचलन्याचेच काम बापाला करावे लागते. स्वत: जन्माला घातलेली पोरेच त्याची बाप बनतात व बापालाच पोराच्या आज्ञा पाळाव्या लागतात कांही ठिकाणी मुले आणि सुना म्हाता-यांना छळतात त्यांचे हाल करातात त्यांना घरा बाहेरही काढले जाते अशा कांही दुर्दैवी निराधार वृध्दाचे हाल बघुन इतर तरुण शेतकरी मनातून ढवळून जातात. व आपल्याला असा प्रसंग आला तर काय होईल या कल्पनेने सदैव चिंतेत असतात म्हणूनच तुमचे घरात हाल होतात का या प्रश्नाचे उत्तर कांही वृध्दांनी होय असे दिले तर कांही जनानी नांही असे दिले.

ज्यांनी आपले हाल होत नांहीत असे सांगीतले त्यांना तुमच्या शेजारील गल्लीत किंवा गावात वृध्दांचा छळ असण्याची उदाहरणे आहेत का? या प्रश्नाला त्यांनी अशी अनेक उदाहरणे आमच्या गावात आहेत. अशी उत्तरे दिली तसा प्रसंग आपल्यावरही येईल असे तुम्हाला वाटते का ? या प्रश्नावर ही कोणी सांगावे नशीबात काय लिहले आहे ते असा प्रसंग येईलही कदाचित् असे उत्तरे दिले या सर्वांचा अर्थ असा की भारतीय शेतकरी आणि शेतकरी वृध्द वृध्दापकाळातील आवस्थेत मानसिक दृष्टया निराधार असुरक्षित आणि चिंतेत वावरत असतो.

पैलतीर दिसू लागलेला असतो मृत्यूची चाहूल लागलेली आहे मृत्यूची भितीही वाटत असले परिणामी परमेश्वरा विना दुसरा आधार वाटत नांही म्हणून वृध्द शेतकरी या वयात सतत परमेश्वराचे नामस्मरण करीत असतात हळवे बनलेले असतात उठता बसता देवाचे नांव घेत असतात.

<u>वृध्दांच्या असुरक्षिततेची, निराशेची किंवा मानहानीची कारणे</u>

शेतक-यांना वृध्दापकाळी असुरक्षित अवस्था प्राप्त होण्याची त्यांची मानहानी किंवा मानखंडना घडून येण्याची किंवा इतरांच्याशी भांडण तंटे निर्माण होण्याची कारणमीमांसा काय असावी? याचा

मागोवा घेण्याचा प्रयत्न अभ्यास क्षेत्रातील वृध्द शेतकऱ्यांच्या मध्ये केला असतांना जी कारणे आढळून आली यांचे स्वरुप पुढील प्रमाणे -

[१] आर्थिक दारिद्र्य किंवा विपन्नावस्था :-

शेतकरी वृध्दांच्या आयुष्याचा शेवटचा कालखंड निराशा मन:स्थितीत जात जाती किंवा त्यांना असुरक्षित वाटते. निराधार वाटते त्यांच्यावर मानहानीचे प्रसंग येतात याचे मुख्य कारण म्हणजे आर्थिक दारिद्र्य हे असते. असे अभ्यास पहाणी मध्ये आढळून आले आहे. ज्या घरा मध्ये आर्थिक सुवस्था असते त्या घरातील वृध्द आई वडीलांचा सांभाळ करतांना कुटूंबीयांनाच फारसा त्रास जाणवत नाही. म्हणून त्यांच्या औषध पाणी यांची इतर गोष्टींची पूर्तता होत असते. वाडवडीलांनी जमीन जुमला मिळवून ठेवल्यामुळे आपल्याला इतरांच्या पेक्षा चांगले जीवन जगता येते यांची जाणीव असल्याने सर्वजन त्यांच्याशी आदाराने वागतात. ज्या शेतकरी कुटूंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असते त्यांच्या पाठीमागच्या पिढयांनी संपत्ती विशेषत: जमीन मिळवलेली असते किंवा वडीलार्जीत जमीन जुमला टिकवून ठेवलेला ही वस्तूस्थिती असते म्हणूनच त्यांचे शेवटचे दिवस बरे जातात मुलाखतीच्या वेळी ज्या थोड्या वृध्दांनी आपण सुरक्षित आहोत समाधानी आहोत मुले आपला सांभाळ करतात अशी उत्तरे दिली त्यांची जमीन ७ एकरा पेक्षा जास्त व बागायत स्वरुपाची

असल्याने आर्थिक परिस्थिती बरी व कर्ज काढण्याचे प्रमाण कमी असल्याचे त्यांच्या मुलाखतीत त्यांनी कथन केले आहे. याच्या उलट बहुसंख्य शेतकरी वृध्दांनी आपली असहाय्य अवस्था ई सांगीतली. त्यांची जमीन फारच कमी किंवा ते भूमीहीन असल्याचे आढळले. आर्थिक विपन्नावस्था असल्याने कुटूंबतील लोकांचा किंवा कुटूंबाच्या गरजा भागविण्यासाठी किंवा सर्वांच्या हातातोंडाला मेळ घालण्यासाठी मेटाकुटीला यावे लागते त्याचा परिणाम वृध्द अशा कुटूंबाला भार वाटू लागतात. कर्जाच्या कचाट्यात सापडलेल्या या कुटूंबातील लोकांचा असा गृह झालेला असतो की आपल्या आई वडीलांनी आपल्यासाठी कांही मिळवून तर ठेवले नांहीच उलट कर्जाचा बोजा आपल्या डोक्यावर ठेवला आहे. आपले व आपले मुला बाळांचे पोट भरण्याच्या यातायात होत असतांना निकामी असलेल्या म्हातार्‍यांची जबाबदारी स्वीकारण्याची त्यांची मानसिक तयारी नसते. अशा वेळी जे निर्ढावलेले असतात ते सरळ आपल्या म्हातार्‍या आई वडीलांना " आमचे आम्हाला पुरे झालेले आहे तुमचे तुम्ही बघा " असे म्हणून घरा बाहेर काढतात. एकापेक्षा जास्त मुले असतील तर एकादा मर्जी सांभाळून वृध्द त्याचा आसरा मिळवितात. विशेत: मुले विभक्त होत असतांना जे दृश्य दिसते ते या दृष्टीने बोलके आहे.

विभक्त होताच मुले घरातील सर्व किडूक मुडूक वाटून घेतात असलेल्या जमीनीचे बरोबर हिस्से पाडून त्या प्रमाणे हद्दी ठरवून जमीनी घेतल्याजातात गोठ्यातील जनावरे किंवा मेंढ्या देखील बरोबर मोजून वाटून घेतल्या जातात. पण म्हातारे आईवडील मात्र आपल्याकडे घेण्याची कोणाची तयारी नसते शेवटी म्हातारा एका कडे व म्हातारी दुस-याकडे अशी विभागणी पंच करुन देतात. किंवा माधुकरी पो-या प्रमाणे प्रत्येक मुलाकडे वर्षा सहा महिन्याचा कालावधी ठरवून त्या प्रमाणे काळ कंठावा लागतो. किंवा कोणाचेही तयारी नसेल तर या उतार वयात म्हातारा म्हातारीला स्वत:ची वेगळी चूल मांडून नेटाने संसाराची सुरुवात करावी लागते ही अतिशयोक्ती नाही अभ्यासकाळात अभ्यास क्षेत्रात अशी आयुष्याच्या किंवा संसाराच्या शेवटी पुन्हा संसाराची सुरुवात वेगळी चूल मांडून करावी लागलेली अनेक दुर्दैवी वृध्द कुटूंबे पहायला मिळाली त्यांच्या मन:स्थितीचा परिस्थितीचा विचार ही कल्पनेच्या पलीकडे आहे. आर्थिक परिस्थिती हालाखीची शारीरीक कुवत किंवा उमेद संपलेली मुला बाळांनी झिडकारलेली अशा आवस्थेत म्हातारा म्हातारीनी स्वतंत्र चूल पेटवून संसार करणे म्हणजे जिवंत पणी मरण यातना भोगले असाच अर्थ होतो. म्हणूनच ग्रामीण शेतकरी किंवा वृध्द आपल्या म्हातरपणाला घाबरत असतात.

[२] मुलांच्या मनातील सूडाची भावना :-

शेती हा तशा शारीरीक दृष्ट्या त्रासाचा व कष्टाचा व्यवसाय उन वारा पाऊस रात्र दिवस वेळ काळ याचा विचार शेती व्यावसायीकांना करतायेत नाही. हंगामानुसार रात्रीचा दिवस करून कामे केली तरच पोटा पुरते पिक हाताला लागते. वरून मुसळधार पाऊस कोसळत असतांना दिवसभर गुडघ्या भर चिखलातून भांगलन किंवा कोळपण करणारा शेतकरी थंडी वा-याची तमा न बाळगता ढळ्यावर रात्रभर मळणी करणारा शेतकरी डोक्यावर सूर्य तळपत असतांना नंगरनी करणारा उघडा वाघडा शेतकरी किंवा प्रसंगी रात्रभर उसात शिरून डोळ्याचेच दिवे करून अंधारात पाणी पाजणारा शेतकरी सिनेमात किंवा चित्रात बघायला ठिक वाटतो. पण तसले जीवन जगण्याचा प्रत्यक्ष प्रसंग आल्याशिवाय त्याच्या ख-या यातना कळणार नाहीत ही कष्टाची कामे शेतकरी स्वत: करतो. व आपल्या बायका मुलानाही करायला भाग पाडतो. अशी कष्टाची कामे करण्याची बायका मुलांची प्रत्येक वेळा तयारी असतेच असे नाही. विशेषत: मुले तक्रारी करतात कारण त्यांच्या कोवळ्या शारीराला ही सवय होई पर्यंत त्रास होतो अशा वेळी शेतकरी पुरुष धाकधपट्याशी दडपशाईचा मार्ग अवलंबीतो बायका पोरांना शिवीगाळ प्रसंगी मारहान करतो

त्यांच्या अंगात ताकत असते तो पर्यंत नाईलाजास्तव बायका मुले सहन करतात पण त्यांच्या मनात त्या माणसा विषयी कायमची अढी निर्माण होते. त्यांचा असंतोष मनात धुमसत असतो मुलगा मोठा झाला आणि वडील उतार वयाला लागला की हा असंतोष उफाळून येतो व सूडाची भावना व्यक्त होवू लागते न कळत हे घडते " म्हाता-याने आयुष्यभर त्रास दिला आणि आताही ताप देत आहे. हा गेल्या विना: आपली सुटका नांही. मरले तर बरे होईल " असे उद्गार मुले काढतात याचा अर्थ हाच आहे मध्नच मुले पहात नांहीत असे १७ टक्के वृध्दांनी सांगीतले तर सुना त्रास देतात असे २२ टक्के वृध्दांनी बोलून दाखविले.

[३] <u>अज्ञान किंवा निरक्षरता :-</u>

वृध्द शेतकरी आपल्या जीवनातील स्वास्थ्य हरवून बसतात किंवा त्यांना अपमान सहन करीत जगावे लागते त्याला आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे त्यांचे अज्ञान आजचे वृध्द हे स्वातंत्र्य पूर्व काळात जन्माला आलेले व वाढलेले नागरीक आहेत ज्या काळात शिक्षणाची साधने उपलब्ध नव्हती त्या काळात बालपन व तारूण्य गेल्याने या पिढी मध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे x शिक्षण नांही वाचन नांही म्हणून

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

टिप- प्रकरणाच्या शेवटी असलेला शिक्षण विषयक आलेख पहावा

बदलत्या जगाची कल्पना नांही जीवनाच्या मर्यादा समजत नांहीत लहान मुलाशी कसे वागावे याची कल्पना नांही त्याचे परिणाम त्यांच्या वृध्दात काळी भोगावे लागतात जग बदलले असतांना जुनी पिढी हे बदल स्वीकारीत नांही त्या मुळे करत असलेल्या सर्व गोष्टी चुकीच्या आहेत असा पूर्व ग्रह त्यांच्या मानात कायमचा असतो म्हणूनच मुलांच्या प्रत्येक कृती बद्दल तक्रारी करतात या वागण्या मुळेच वाटोळे झाले पाऊस पाणी कमी झाले अशी विधाने वृध्द करतांना आढळतात. त्यामुळे कौटुंबीक तनाव निर्माण होतेच

जीवनाचा खरा अर्थ किंवा मर्यादा अशिक्षित वृध्दांना समजत नांहीत. ५० शी नंतर आपल्या पूर्वजानी वानप्रस्ताश्रम किंवा ७५ री नंतर पूर्ण सन्यास का घ्यावा सांगीतले होते त्याचा अर्थ त्यांना समजत नांही मुले करती सवरती झाल्या नंतर त्यांच्या मार्गातील अडथळा न बनता स्वत:हून निवृत्त व्हायला पाहिजे हे आडाणी माणसाच्या लक्षात येत नांही आम्ही कांही वृध्दांना असा प्रश्न विचारला की," वयाच्या ७७ व्या वर्षी तुम्हाला ५० हजार रुपये दिले तर काय कराल ?" ब-याच वृध्दांनी या प्रश्नाचे उत्तरे आम्ही शेती लोक विहीरी काढून घर बांधू असे दिले आयुष्याचा शेवट जवळ आलता असतांनाही गुंतवणूक करण्याचा विचार येतो याचा एक ह अर्थ त्या व्यक्तींना

अद्याप जीवनाच्या नैसर्गीक मर्यादा समजलेल्या नसतात किंवा आपल्या मुला बाळांच्या साने त्या व्यक्ती क पुन्हा जीवन जगन्याचाहव्यास धरुन असतात यामुळे निराशा पदरात येते

लहान मुलांना लहानसहान गोष्ठीसाठी रागविने किंवा मारणे बरोबर नांही याची जान अज्ञान आदानी शेतक-यांना नसते म्हणून बायका मुलांना मारहान करुन ते आपल्या कुटूंबाचे स्वास्थ्य बिघडवितात व शेवटी पश्चातापाची पाळी येते.

निष्कर्ष :-

शेतकरी वृध्दाचे कुटूंबा मध्ये गौन स्थान निर्माण होते. त्याचे कुटूंबीयासी खटके उडतात संघर्ष होतात ते मानसिक दृष्टया असमाधानी व असुरक्षित असतात. आर्थिक विपन्नावस्था निरक्षरता किंवा अज्ञान शेती व्यवसायाचे स्वरुप ह्या कांही गोष्टी या परिस्थतीला कारणी भूत आहेत यातबिल कांही गोष्टी नांहीसी करता येतील तर कांही कारणे ताबडतोब नांहीशी होणार नांहीत. कांही गोष्टींची वेळ निघून गेलेली उदाहरणार्थ वृध्दांच्यातील निरक्षराता किंवा अज्ञान आता घडविता येणार नांही ती वेळ टळून गेलेली आहे. तसेच मुला बाळाशी कसे सामंजसाने वागावे हे शिकण्याचे किंवा शिकविण्याचे वृध्दाचे वय निघून गेलेले असते त्यामुळे त्यांच्या स्वभावात फरक पडण्याचे शक्यता नसते अशा वेळी त्यांना आर्थिक दृष्टया स्वालंबी करुन त्यांच्या मनातील

असुरक्षीततेची व परावलंबीत्वाची भावना कमी करण्यासाठी कांही प्रकल्प किंवा योजना राबविणे शक्य आणी आवश्यक आहे. पुढील पानावर जे कोष्ट दिलेले आहे. त्या मध्ये ३९ टक्के व्यक्तीना आपण सुरक्षित असल्याचे वाटते उरलेल्या ६१ टक्के लोकांना असुरक्षित वाटते त्याची कारणे ही सदर कोष्टकात नमूद केलेली आहे. म्हातार पणी वाईट दिवस आले म्हणणाऱ्यांची व त्यांनीच सांगीतलेल्या कारणाची माहिती प्रकरणाच्या शेवटी आलेखात दिलेली आहे. शेतकरी समाजाच्या मागासले पणाचे प्रमुख लक्षण व कारण असलेल्या शैक्षणिक मागासले पणाचे चित्र शिक्षण विषयक आलेखा मध्ये दाखविलेले आहे जास्तीत जास्त शेतकरी अशिक्षीत व उरलेले अर्ध शिक्षीत आहेत. फारच थोडे शेतकरी शिक्षीत किंवा सुशिक्षीत येतात असेच या आलेखा वरुन सिध्द होते.

वृध्दाप काळाच्या असुरक्षिततेचे विवरण दर्शाविणारे पत्रक

| वृध्दापकाळी असुरक्षित वाटत नाही कारण | | | | वृध्दापकाळी असुरक्षित वाटते कारण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तरतूद आहे. | चांगली मुले सांभाळतात | स्वत: काम करतो | एकूण | तरतूद केली नाही | मुले पहात नाही | सुना व नातवंड त्रास देतात. | काम झेपत नाही | एकूण |
| २६ | १० | ३ | ३९ | १८ | १७ | २२ | ४ | ६१ |



म्हातारपणी वाईट दिवस आले असे वाटण्याच्या
कारणांची टक्केवारी दर्शविणारा आलेख
प्रमाण १ सें.मी = ४ %



वृद्धांचे शिक्षण दर्शविणारा आलेख
प्रमाण १ सें.मी = २ वृद्ध
य
३०
२५
२०
१५
१०
५
२९
२३
१८
१६
१४
क्ष
अशिक्षित
१ली ते ४थी
५वी ते ८वी
९वी ते १०वी
पदवीपर्यंत


- शिक्षण -